**मिरा भाईंदर महानगरपालिका**
**माहिती व जनसंपर्क विभाग**
**प्रसिद्धीपत्रक**

- **श्री गणेशोत्सव 2025 निमित्त विसर्जन स्थळांची मिरा-भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्तांनी केली पाहणी**

श्री गणेशोत्सव 2025 निमित्त मिरा-भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद अ. शर्मा (भा.प्र.से.) यांनी आज गुरुवार, दिनांक 21 ऑगस्ट 2025 रोजी शहरातील विविध प्रमुख विसर्जन स्थळांना भेट देऊन तेथील तयारीचा प्रत्यक्ष आढावा घेतला.

काशिमीरा जरीमरी तलाव, सातकरी तलाव मिरा रोड, साईदत्त तलाव पेणकरपाडा, शिवार गार्डन तलाव, नवघर तलाव भाईंदर पूर्व, जेसल पार्क चौपाटी तसेच भाईंदर पश्चिम चौपाटी या ठिकाणी प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. या पाहणीदरम्यान मा. आयुक्तांनी विसर्जन काळात नागरिकांसाठी करण्यात येणाऱ्या सोयीसुविधांचा सविस्तर आढावा घेतला. सुरक्षिततेसाठी केलेल्या तयारी, स्वच्छतेची काटेकोर व्यवस्था, वीजपुरवठा आणि प्रकाशयोजना, वैद्यकीय सुविधा, पोलीस व सुरक्षेची यंत्रणा सज्ज ठेवण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या. या प्रसंगी अतिरिक्त आयुक्त डॉ. संभाजी पानपट्टे, शहर अभियंता दिपक खांबित, कार्यकारी अभियंता नितीन मुकणे यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी व महानगरपालिकेचे कर्मचारी उपस्थित होते.

कृत्रिम तलावांसोबत मुर्ती स्विकृती केंद्राची स्थापना करण्यात येणार आहे. तसेच **६ फूटाखालील मुर्ती कृत्रिम तलावात विसर्जन करणे बंधनकारक** आहे. पूजासाहित्य पाण्यात न टाकता स्वतंत्ररित्या जमा करून महानगरपालिकेस सहकार्य करावे. समुद्र, खाडी व तलावांमध्ये प्लास्टिक टाकू नये. तसेच विसर्जनाच्या वेळी प्रशासन व पोलीस यांचे मार्गदर्शन घेऊन शिस्त पाळावी, असे आवाहन मा. आयुक्तांनी केले. श्री गणेशोत्सव हा सामाजिक ऐक्याचा आणि पर्यावरणपूरकतेचा संदेश देणारा सण आहे. त्यामुळे स्वच्छता, सुरक्षितता आणि पर्यावरण संरक्षण यांना प्राधान्य देत नागरिकांनी हा **उत्सव पर्यावरणपूरक साजरा** करावा, असे मिरा भाईंदर महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने आवाहन करण्यात येत आहे.